# ऑडिओ कथांचे दालन ,

# बंजारा अभिव्यक्तीचे संप्रेषण


सादरकर्ती - वनिता चत्रुसिंग वंजारी

**M.A. Bed (edu)**

विषयसाधनव्यक्ती ठाणे डाएट

**वनिता चन्द्रसिंग वंजारी**

**M.A. Bed (edu)**

**विषयसाधनव्यक्ती ठाणे डाएट**

# ऑडिओ कथांचे दालन बंजारा अभिव्यक्तीचे संप्रेषण

- **प्रास्ताविक : -**

बालकाच्या विकासाच्या प्रक्रियेत गोष्टीचे अनन्यसाधारण महत्त्व आहे पूर्वी घरात आजी-आजोबा नावाचे गोष्टींचे वटवृक्ष होते. त्यांच्याकडे गोष्टींचा खजिना असायचा त्यामुळे आजी आजोबा हेच मुलांचे भाव विश्व होते त्यांचे व नातवांचे नाते घट्ट असायचे आज विभक्त कुटुंब पद्धतीमुळे नात्यातील ओलावा अटत चालला आहे याचे कारण गोष्टींचा अभाव.सध्या बालकांना जवळ घेऊन गोष्ट संगणारेच नाहीत. पूर्वी शाळेत गोष्ट सांगणारे गुरुजी मुलांना अतिशय आवडत, आता पुन्हा गोष्टी बालकांच्या कानी गेल्या तर मूल्यांची पेरणी होण्यास निश्चितच मदत होईल आत्ताच्या आनंददायी शिक्षण पद्धतीत गोष्टींचा विचार याचसाठी केलेला आहे गोष्टींची वाट जितक्या जास्त वेगात पुढे जाईल तितक्या मोठ्या प्रमाणावर बालकांच्या व्यक्तिमत्त्वाला पैलू पाडण्यात सुरुवात होईल आणि ही गोष्ट जर त्यांना त्यांच्या स्वतःच्या बोलीभाषेत ऐकण्यास मिळाली तर त्यांच्या मनावर खोलवर रुजतील कारण आपल्या परिचित भाषेत ऐकण्यात जो ओलावा असतो तो त्यांना मिळेल. आणि मूल्य आतवर रुजतील..भाषा शिकविणे याकडे केवळ भाषा या अर्थाने न बघता त्या भाषेत त्या समाजाचे घट्ट नाते असते त्यात त्यांची संस्कृती परंपरा असते भाषा माणसांना एकत्रित आणते एकसंघ ठेवते त्यातून भाषिक अस्मिता दृढ होते म्हणून आपण कुठेही गेलो तरी आपली भाषा बोलणारी माणसे आपल्याला जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन आपली वाटतात.नाते घट्ट करण्याचे काम भाषा ही करत असते भाषा संवादाने माणसांना एकत्रित आणण्याची शक्ती आहे विद्यार्थ्यांना त्यांच्या बोलीभाषेतूनच जर साहित्य वाचायला व ऐकायला मिळाले तर त्या गोष्टींचा त्यांच्या मनावर परिणाम होतो मुलांच्या कानावरती त्यांची बोलीभाषा परिसरातील भाषा मातृभाषा यांचे शब्द येत असतात यातील त्याला जवळची भाषा ही त्याच्या घरात बोलली जाणारी जी भाषा असते तीच असते जर घरची भाषा हे शिक्षणाचे माध्यम बनले तर मुलांचे आकलन समृद्ध होत जाते विचारांची प्रक्रिया गतिमान होते. अभ्यासक्रमात असलेल्या संकल्पना अधिक उत्तम स्वरूपात आकलन होतात ह्याच पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडणाऱ्या बोलीभाषेतून त्यांच्यासाठी ऑडिओ कथांचे दालन ,बंजारा

अभिव्यक्तीचे संप्रेषण हा नवोपक्रम  देण्याचा एक छोटासा प्रयत्न, यातून विद्यार्थ्यांचे मनोरंजन तर होईलच बरोबरच त्यांची वैचारिकता,कल्पकता व विविध अनुभव मिळून त्यांचे अनुभव समृद्ध करण्याचा हा प्रयत्न...

- **गरज व महत्त्व:-**

मी विषय साधन व्यक्ती म्हणून ठाणे महानगरपालिकेच्या कळवा प्रभागात काम करीत असताना माझ्या कार्यक्षेत्रात परप्रांतीय व मागासवर्गीय समाजातून आलेल्य वस्तीत वेठबिगारी व वीटभट्टीवर काम करणाऱ्या विविध बहुभाषिक पालकांची ही मुले होती.येथील विद्यार्थ्यांची सर्वात मोठी समस्या बोलीभाषा व या बोलीभाषेवर मी काम करीतच होते. कोविड-19 ला सुरुवात झाली आणि ही सर्व कुटुंब स्थलांतरित झालेली.दीड वर्षानंतर जेव्हा हळूहळू स्थिती पूर्ववत होत होती तेव्हा हे कुटुंब उदरनिर्वाह साठी परत आले. यानंतर ह्या कुटुंबाशी संपर्क केला.

सुरुवातीला सात ते आठ महिने यांच्याशी संपर्क होत नव्हता परंतु शाळेत यांची नावं होती त्यामुळे ज्यावेळेस लॉकडाऊन संपला व ही पालक गावाहून घरी आले त्यावेळेस शिक्षकांनी अनेक प्रयत्नांनी यांच्याशी संपर्क साधले व त्यातून बऱ्याच विद्यार्थ्यांचे व्हाट्सअप मोबाईल क्रमांक वगैरे मिळाले.जून 2021 मध्ये शाळा सुरू झालेल्यात परंतु विद्यार्थी अजूनही शाळेत येत नव्हते त्यावेळेस ऑनलाईन पद्धतीने शिक्षण सुरू झालेले त्यातील काही विद्यार्थ्यांचे नंबर हे शिक्षकांनी मिळविले. विद्यार्थ्यांचे संपर्क नंबर मिळविल्यानंतर आम्ही त्या विद्यार्थ्यांना गृहभेटी दिल्यात.

विद्यार्थ्यांमध्ये कोविड बद्दलची भीती पसरलेली होती त्यात त्यांचं बाहेरचं खेळणं बागडण बंद झालेलं, घरात एकतर टीव्ही किंवा मोबाईल यामुळे त्यांच्या मनाची अवस्था बिकट झालेली. आणि त्यामुळे पालक सुद्धा नाराज झालेले होते. ज्यावेळेस शिक्षकांसमवेत त्यांच्या घरी गृहभेटी दिल्या त्यावेळेस पालकांनी ही समस्या सांगितली की विद्यार्थी संपूर्णपणे अभ्यास विसरले आहेत. वाचन ही विसरलेत.

गृहभेटीत पालक व विद्यार्थ्यांशी मी स्वतः बंजारा बोलीत चर्चा केल्यानंतर त्यांनी माझ्याशी खूप चांगल्या प्रकारे गप्पा केल्या. त्यावेळेस त्यांना मी एक छानशी बंजारा बोलीत गोष्ट सांगितली ती गोष्ट सर्वांनी आवडीने ऐकली व त्यावर चर्चा ही केली. गोष्ट ऐकायला सर्वांनाच आवडते. त्यात ती आपल्या भाषेतील असेल तर ती मनापासून ऐकतात त्यावर विचार करतात मुलांना मी सांगितलेली गोष्ट खूप आवडली पालकही बोललेत मॅडम तुम्ही घरी येऊन आमच्या मुलांशी एवढ्या गप्पा मारल्या गोष्ट सांगितली,मुलांची भीती कमी केली त्यांना अशा प्रकारे जर समजावून सांगितले तर नक्कीच ते या भीतीतून बाहेर येतील तुम्ही नेहमी येत राहा. तुम्ही

थोडा वेळ जरी आलात तरी मुलं तुमच ऐकतील आणि मुलं आई-वडिलांपेक्षा शिक्षकांचे खूप ऐकत असतात पालकांचे जेव्हा हे विचार ऐकले तेव्हा विचार केला की नेहमी येणं तर शक्य नाही होणार पण यांना आपण अस खाद्य पुरवूयात जेणेकरून हे  घरी बसून त्याचा लाभ घेतील.

**खालील गरजांचा विचार करून नवोपक्रम राबविण्याची गरज वाटली.**

- 1.विद्यार्थ्यांच्या मनातील भीती दूर करण्यसाठी त्यांना गुंतुवून ठेवणे गरजेचे वाटले.
- 2. ऑडिओ गोष्टींच्या माध्यमातून त्यांचे मनोरंजन करणे.
- 3.बंजारा ऑडिओ गोष्टींच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये मूल्यांची रुजवणूक करणे.
- 4.आपल्या परिचयाच्या भाषेतून जर त्यांना जास्तीत जास्त अनुभव समृद्ध केले तर त्यांचे अभिव्यक्ती कौशल्य वाढेल.
- 5. सोशल मीडियाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या स्वतःच्या बोलीभाषेचे जतन करणे व बोलीभाषेचा विकास करणे शक्य होईल .

- **महत्व-**

- 1.नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात विद्यार्थ्यांच्या बोलीभाषेचा विचार करण्यात आलेला आहे व आनंददायी शिक्षण पद्धतीच्या शासन निर्णयात ही  बोलीभाषेला स्थान देण्यात आले आहे आणि ह्याच बोलीभाषेचा विचार करून ऑडिओ कथांचे दालन बंजारा अभिव्यक्तीचे संप्रेषण' हे नवोपक्रमाचे महत्वपूर्ण वैशिट्य आहे.
- 2.कोविड च्या परिस्थितीत मुलांना घरी राहूनच त्यांच्या बोलीभाषेत ऑडिओ गोष्ट ऐकण्यास देऊन त्यांच्यात नैतिक मूल्य रुजविणे हे ह्या नवोपक्रचे महत्व आहे.
- 3.विद्यार्थ्यांच्या स्वतःच्या बोलीभाषेला शाळेत स्थान मिळवून देणे.
- 4.विद्यार्थ्यांच्या मनातील कोविड ची भीती जाण्यासाठी त्यांना जास्तीत जास्त चांगले अनुभव गोष्टींच्या माध्यमातून ऐकवणे.
- 5.विद्यार्थ्यांच्या बुद्धीला चांगले खाद्य देऊन ते अधिक कृतिशील होण्यासाठी व त्यांची कल्पकता वाढविण्यासाठी हा नवोपक्रम महत्वपूर्ण आहे.

- **उद्दिष्टे:-**

- बालकांच्या विकासाच्या प्रक्रियेत गोष्टींचे अनन्यसाधारण महत्व आहे आणि याच गोष्टी त्यांना आपल्या बोली भाषेत ऑडिओ स्वरूपात ऐकण्यास देऊन त्यांच्यात मूल्यांची पेरणी करणे.
- 2. ऑडिओ गोष्टींच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा भावनिक,मानसिक व बौद्धिक विकास करणे.
- 3. कोविड मुळे विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण झालेली भीती ऑडिओ गोष्टींच्या साहाय्याने दूर करणे व त्यांना परत शिक्षणाच्या प्रवाहात आणणे.
- 4. सोशल मीडियाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या बोलीभाषचे जतन करणे व बोलीभाषेचा विकास करणे.
- 5.गोष्टींच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची कल्पकता व स्व-अभिव्यक्ती कौशल्य निर्माण करणे.

- **नवोपक्रमाचे नियोजन**
- **उपक्रम पूर्व स्थितीचे निरीक्षण-**

कोविड 19 मुळे मुलांचे खेळणे, बागडणे शाळेत येणे बंद झालेले त्यांना घराबाहेर जाण्याची बंदी झाली त्यामुळे त्यांच्यात एकटेपणा, चिडचिडेपणा व भीती वाढलेली होती. 2021 च्या जुलै,ऑगस्ट मध्ये विद्यार्थ्यांच्या घरी गृह भेट दिली त्यावेळेस पालक सांगू लागले की, मुले आतून खूप घाबरली आहेत घरात राहून एकसारखे टीव्ही बघून ते कंटाळलेत शाळेत जो काही अभ्यास शिकवत होते तो अभ्यासही ते आता विसरलेत.त्यांचे वाचणे,लिहिणे बंद झालेय त्यांना या सर्वातून बाहेर येण्यासाठी त्यांना आवडेल असं कोणते तरी काम देणे अपेक्षित होते त्यांची अभ्यासाची आवड तर कमीच झालेली पण परत आपण शाळेत जाऊन शिकू असेही त्यांना वाटत नव्हते. विद्यार्थ्यांमध्ये निराशा वाढलेली होती. कोविड नंतर शाळा भेटीस गेल्यावर शाळेत शिक्षक येत होते परंतु विद्यार्थी अजूनही शाळेत येत नव्हते, शिक्षकांना आठवड्यातून विद्यार्थ्यांच्या घरी गृहभेट देणे चालू होते. शिक्षकांना इतर कामांमुळे गृह भेट देऊन विद्यार्थ्यांचा अभ्यास घेणे ही शक्य नव्हते त्यामुळे त्यांना घरी बसून असं काहीतरी देणं आवश्यक होतं की ज्यामुळे त्यांची मरगळ निघून त्यांच्यात चैतन्य निर्माण होईल व त्यांना आनंदही होईल त्यांच्या मनातील भीती कमी होईल व ते पुन्हा प्रेरित होऊन शिकते होण्यासाठी प्रवृत्त

होतील.गृहभेटीत पालकांशी चर्चा केल्यानंतर व विद्यार्थ्यांशी गप्पा केल्यानंतर मला लक्षात आले की विद्यार्थ्यांना गोष्ट सांगितलेली खूप आवडते व ती जर त्यांच्या स्वतःच्या भाषेत असेल तर ते आवर्जून ऐकतात अशाप्रकारे पूर्वस्थिती बघितल्यानंतर  ठरविले की विद्यार्थ्यांना सोशल मीडियाच्या माध्यमातून त्यांच्या बुद्धीला काहीतरी खाद्य पुरविणे गरजेचे आहे व अशाप्रकारे ऑडिओ कथांचे दालन बंजारा अभिव्यक्तीचे संप्रेषण नवोपक्रमाला सुरुवात झाली.

- **संबंधित व्यक्तींशी, तज्ज्ञांशी चर्चा:-**

सर्वप्रथम नवोपक्रम करण्याचे ठरविल्यानंतर आमच्या  ठाणे डाएट चे प्राचार्य आद. डॉ. भरत पवार साहेब यांची या नवोपक्रमासाठी अनुमती घेतली. त्यानंतर डायटचे अधिव्याख्याता कुमार पाटील सर यांच्यासोबत या नवोपक्रमा संदर्भात चर्चा केली तर त्यांनी तुम्ही बंजारा बोली भाषेवर काम करीत आहात तर तुम्हाला बोली भाषेतून ऑडिओ स्वरूपात गोष्टी तयार करणे  ही सोपे जाईल व सर्वच बंजारा भाषिक विद्यार्थ्यांना आपल्याला पाठविता येईल असे सांगितले. तुमच्याकडे गोष्टींचा संग्रह ही तयार होईल त्या आपण इतर डाएट ला ही पाठवू. त्याचबरोबर SCERT मार्फत आपण शनिवारच्या गोष्टी पाठवितोच त्याचा ही ह्या उपक्रमाला अनुसरून फायदा होईलच.त्यांनी ही उपक्रमा संदर्भात मार्गदर्शन केले.

आवश्यक साधनांचा विचार- सर्वप्रथम बाल साहित्यातील छोट्या छोट्या गोष्टी,श्यामच्या आई च्या पुस्तकातील निवडक अनुभव ,राजीव तांबे यांचे बालसाहित्य,  शारदा चौधरी यांचे वाचू आंनदे मूल्यवर्धनाच्या संगे, बालकथा अश्या विविध पुस्तकांचे संकलन केले.

ह्या सर्वांची पुस्तके वाचली त्यातील गोष्टींची निवड केली व त्या गोष्टींचे  बंजारा भाषेत अनुवाद केले. त्यांचे टंकलेखन केले नंतर गोष्टींचे बंजारा बोलीत  रेकॉर्डीग केले.

साहित्य तयार झाल्यानंतर विद्यार्थ्यांचे संपर्क क्रमांक व पत्ते घेऊन प्रथम गृहभेटी, व व्हाट्सअप ग्रुप तयार केले. व अश्या प्रकारे आवश्यक साधने यांची जुळवाजुळव केली.

- **4.करावयाच्या कृतींचा क्रम-**
  - 1.बाल साहित्य कथा,श्यामची आई,राजीव तांबे यांची रंगीत जादू,घरात खेळा खेळ,गमती जमती, छोट्या छोट्या गोष्टी,श्यामची आई,रंगू मूल्यवर्धनाच्या संगे या पुस्तकांतील मूल्यवर्धक गोष्टींची निवड करणे.
  - 2.निवडक प्रमाण भाषेतील गोष्टींचा बंजारा बोलीभाषेत अनुवाद करणे.
  - 3.बोलीभाषेतील अनुवाद केलेल्या गोष्टींचे रेकॉर्डिंग करणे.

- 4.इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांच्या गृहभेटी करून पालक व मुलांशी चर्चा करणे.

  विद्यार्थ्यांचे व्हाट्सअप ग्रुप तयार करणे.

- 5.आठवड्यातून एक किंवा दोन गोष्टी पाठवून ती ऐकण्यास सांगणे.
- 6.आठवड्यातुन एक दिवस पालकांशी संपर्क करणे.
- 7.महिन्यातुन एकदा गुगल मीट ने सर्व विद्यार्थ्यांशी ऐकलेल्या गोष्टींसंदर्भात चर्चा..
- 8.ऐकलेल्या गोष्टींवर आधारित कृती करायला देणे.
- 9.तीन ते पाच शब्द देऊन त्यांना त्यावर गोष्ट तयार करायला सांगणे.
- 10.काही अपूर्ण गोष्टी पूर्ण करायला सांगणे.
- 11,पालक व विद्यार्थ्यांचे अभिप्राय घेणे.
- 12.ऑडिओ कथांचे दालन,बंजारा अभिव्यक्तीचे संप्रेषण हे इतर तालुक्यात व जिल्ह्यात ही दर आठवड्याला पाठविणे.

- **उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण:-**

उपक्रम सुरळीत सुरू झाल्यानंतर किती विद्यार्थ्यांनी गोष्टी ऐकल्या हे प्रत्यक्ष पालकांशी फोनवर संपर्क साधून विचारत होते.महिन्यातून एकदा विद्यार्थ्यांशी गुगल मीटिंग द्वारे चर्चा करीत होते ज्या विद्यार्थ्यांना मीटिंग अटेंड करण्यात अडचणी येत होत्या अशा विद्यार्थ्यांच्या घरी गृहभेटी देऊन विद्यार्थ्यांशी व पालकांशी चर्चा होत होती जे विद्यार्थी जवळजवळ राहत होते अशा चार-पाच विद्यार्थ्यांना एकत्रित बोलवून त्यांच्याशी चर्चा होत होती. विद्यार्थ्यांना गोष्टी ऐकल्यानंतर काय वाटले कसे वाटले याबद्दल ती भरभरून बोलत होती नंतर काही गोष्टी ह्या अपूर्ण सोडून त्यांचा शेवट करण्यास विद्यार्थ्यांना सांगण्यात येत होते विद्यार्थी गोष्टींचा आनंद घेत असताना त्यांची वैचारिकता वाढत होती त्यांचे अनुभव समृद्ध होत होते व स्वतः गोष्टी सांगण्याचा ते प्रयत्न करत होते गोष्टींबद्दल ते स्वतःहून मत मांडू लागली व त्यांना तीन ते पाच शब्द दिल्यावर ती स्वतः गोष्टी तयार करू लागले व अभिव्यक्त होऊ लागले. आम्हाला कोणत्या प्रकारची गोष्ट ऐकण्यास आवडेल अशी ही मत मांडू लागली. शामच्या आईच्या गोष्टींच्या काही निवडक कथा त्यांना बंजारा बोलीत ऐकायला दिल्यानंतर विद्यार्थ्यांना आपल्या आईचे महत्व ही वाटू लागले व ती त्याबद्दल भरभरून बोलू लागली पालकांशी ही चर्चा करीत असताना पालक सांगत होते की आम्ही मुलांना आमच्या समोर ज्यावेळेस गोष्टी ऐकायला दिल्यात त्यावेळेस त्या गोष्टीबद्दल ते नंतर माझ्याशीही बोलत होते ह्या कथेत

मला हे आवडले हे असे नको व्हायला हवे होते अशा प्रकारे ती पालकांकडेही आपली मते मांडत होती विद्यार्थ्यांना गोष्टी ऐकायला मिळाल्यानंतर त्या गोष्टी नंतरच्या कृती विद्यार्थी स्वतः घरी करत होते व त्यामुळे पालक सांगत होते की विद्यार्थी आता ह्या गोष्टींमुळे व्यस्त राहायला लागले आहेत स्वतः काहीतरी गोष्टी ते आम्हाला सांगत असतात हे ऐकलेल्या गोष्टी सुद्धा त्या आम्हाला त्यांच्या परीने सांगतात अजय व लक्ष्मी यांनी तर स्वतः एकदा आपल्या भाषेत गोष्ट तयार केली व ती रेकॉर्ड करून पाठविली मुलांच्या मनात कोविड मुळे जी भीती निर्माण झालेली होती ती सुद्धा जाऊन आता ते लवकरच शाळेत जाण्याच्या गोष्टी करतात आम्हाला आमच्या भाषेतून गोष्ट ऐकण्यास आवडते व यातून आम्ही खूप काही शिकतो आमच्या गावाकडील मित्रांना सुद्धा आम्ही या गोष्टी पाठवीत आहोत असे ते म्हणाले

ह्या ऑडिओ गोष्टींबद्दल इतर तालुक्यातील शिक्षकांना,विषयसाधन व्यक्तींना माहिती मिळत गेली तसे त्यांच्या कार्यक्षेत्रात ही ते ह्या गोष्टी पोहचवीत होते.तेथील पालक व विद्यार्थ्यांचाही खूप छान प्रतिसाद मिळत होता.अजूनही गोष्टी मुद्रित करून पाठविणे चालू आहे.

- **6 कार्यवाहीचे टप्पे**

**सदरील नवोपक्रम हा ठाणे महानगरपालिकेच्या कळवा परिसरातील पाच शाळांमधील बंजारा भाषिक विद्यार्थ्यांसाठी सन 2021-22 मध्ये दि.10 ऑगस्ट 2021 पासून राबविलेला असून तो आजपर्यंत चालू आहे..**

**वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| **1** | **गोष्टींचा संग्रह** | **10 दिवस** |
| **2** | **गोष्टींचा अनुवाद** | **15 दिवस** |
| **3** | **गोष्टींचे मुद्रीकरण ऑडिओ** | **30 दिवस** |
| **4** | **प्रत्यक्ष कार्यवाही** | **1 सप्टेंबर 2021 ते आज पर्यंत** |
| **5** | **अहवाल लेखन** | **10 दिवस** |

- **उपक्रमासाठी इतरांची मदत-**

या नवोपक्रमासाठी मला मुख्याध्यापक व शिक्षक यांची मदत घ्यावी लागली .शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे मोबाईल नंबर दिलेत ग्रुप तयार केलेत व गृह भेटीत शिक्षक स्वतः आलेलेत तसेच ज्या विद्यार्थ्यांपर्यंत गोष्ट पोहोचत नव्हती अशा विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षक स्वतः गेलेत व त्यांनी त्यांना ही गोष्ट ऐकवली आठवड्यातून ज्यावेळेस शिक्षक गृहभेटी देत होते त्यावेळेस शिक्षक स्वतः विद्यार्थ्यांना गोष्टी ऐकायला देत व या गोष्टीबद्दल त्यांना काय वाटले हे सुद्धा ते विचारून घेत.त्याचबरोबर ज्या वेळेस शिक्षक विद्यार्थ्यांना शाळेत बोलवत होते त्यावेळेसही ते त्यांना गोष्टी ऐकण्यास देत होते व विद्यार्थी गोष्टी नंतर कोणकोणते कृती घरी करीत आहेत हे सुद्धा पालकांकडून विचारून घेत होते. पालकांची ही ह्या वेळेस खूप मदत झाली.काही गोष्टी तर पालकांनी ही निवडल्या व ह्या गोष्टींचे अनुवाद करून द्या असे बोलले अशाप्रकारे शिक्षक व पालकांच्या मदतीने हा नवोपक्रम पूर्ण करण्यास मदत झाली.

- **उपक्रमासाठी सादर करावयाचे पुरावे:-**

- 1.प्रमाण भाषेतील गोष्टींचे बंजारा बोलीभाषित केलेले अनुवादाचे टंकलेखन
- 2. व्हाट्सअप ग्रुप वरील विद्यार्थ्यांनी पाठविलेल्या प्रतिक्रिया.
- 3. शिक्षकांच्या प्रतिक्रिया
- 4.पालकांचे अभिप्राय व्हिडीओ स्वरूपात
- 5शिक्षकांनी पाठविलेले प्रतिक्रिया व्हिडिओ स्वरूपात
- 6विद्यार्थी व पालकांनी पाठविलेल्या अभिप्रायांची लिंक.
- 7.गोष्टी ऐकतांनाचे फोटो

- **नाविन्यता:-** हा नवोपक्रम पूर्णपणे नवीन आहे.

- 1.एकाच वेळी अनेक समस्यांचे निवारण यामुळे शक्य झाले.
- 2.या नवोपक्रमामुळे विद्यार्थी घरी असून देखील त्यांच्यात ऑडिओ गोष्टी ऐकल्याने मूल्यांची रुजवणूक होण्यास मदत झाली
- 3.कोविड परिस्थितीतुन विद्यार्थ्यांना बाहेर काढण्यासाठी व त्यांच्या मनोरंजनासाठी सोशिअल मिडियाचा साकारात्मक वापर करण्यात आलाय
- 4.ऑडिओ गोष्टींची सुरवात कळवा परिसरातून झाली व आज ह्याच कथांचा श्रोता वर्ग इतर तालुके व बऱ्याच जिल्ह्यातील शाळेतील विद्यार्थी,पालक,शिक्षक व ज्यांना बंजारा भाषा समजते असे सर्व जण याचा वापर करीत आहे हीच ह्या नवोपक्रमाची नाविन्यता आहे..

- **नवोपक्रमाची प्रत्यक्ष कार्यपद्धती:-**
- **1.पूर्वस्थितीची निरीक्षणे व नोंदी:-**

कोविड19 नंतर एक वर्ष शाळा पूर्ण बंद होत्या.नंतर शाळा सुरू झालेल्या पण विद्यार्थ्यांसाठी अजून ही शाळा पूर्ववत झालेल्या नव्हत्या.शाळेत फक्त शिक्षक येत होते.विद्यार्थ्यांना गृहभेटी व ऑनलाईन पद्धतीने अभ्यास घेणे चालू होते.त्याचदरम्यान मुंब्रा,कळवा दिवा परिसरातील बंजारा वस्तीतील विद्यार्थ्यांच्या घरी गृहभेटी त पालकांशी चर्चा करीत असताना लक्षात आले की  गेल्या दीड वर्षांपासून मुलं घरात राहून कंटाळले आहे,त्यांचा चिडचिडेपणा वाढलेला आहे,टीव्ही समोर तासंतास बसून राहणे,खात राहणे यामुळे शरीरावर ,मनावर ही परिणाम झालेला आहे खेळणेच बंद झाल्याने त्यांचे बालपण हरवले आहे,कोविड च्या भीतीने त्यांना ग्रासले आहे.पालक म्हणत आम्ही एवढ्या दुरून येथे स्थलांतरित झालोत ते पोटापाण्यासाठी आम्ही दिवसभर वेठबिगारी काम करतो पोट भरतो त्यात आता हे कोरोना मुळे आम्हाला दिवसेंदिवस काम मिळत नाही त्यात मुलांकडे लक्ष द्यायला वेळ च नसतो.

गृहभेटी दरम्यान बालकांची अशी अवस्था बघून सारखे वाटायचे यांचे बालपण असे कोमेजून जायला नको.यांच्या चेहऱ्यावर हसू आणण्यासाठी काहीतरी करायला हवे जेणेकरून ते ह्या नैराश्येतून बाहेर येतील. व शिकण्यासाठी प्रेरित होतील.गेल्या तीन वर्षांपासून मी माझ्या कार्यक्षेत्रातील बंजारा विद्यार्थ्यांसाठी त्यांना बोलीभाषेतून प्रमाणभाषेत आणण्यासाठी प्रयत्न चालूच होते.ह्याच दरम्यान SCERT चा गोष्टींचा शनिवार हा कार्यक्रम चालू होता या सर्वांचा विचार करून विद्यार्थ्यांना निदान घरी बसून त्यांचं मनोरंजन होईल व त्यांच्यात मूल्यांची पेरणी होण्यास मदत होईल,त्यांच्या बुद्धीला चालना मिळेल. असे त्यांना त्यांच्याच बोलीभाषेतील कथा वाचण्यास व ऐकण्यास दिल्या तर ! हा विचार मनात आला व मी स्वतः बंजारा भाषिक असल्याने मला गोष्ट रेकॉर्ड करणे सोपे जाईल याच विचाराने मी कामाला लागले,वरिष्ठां नी ही परवानगी दिली व ह्या विद्यार्थ्यांसाठी बोधपर कथा,मूल्य रुजविणाऱ्या कथा यांचे अनुवाद करून ते ऑडिओ स्वरूपात पाठवुया असे ठरवून ऑडिओ कथांचे दालन बंजारा अभिव्यक्तीचे संप्रेषण ह्या नवोपक्रमास सुरुवात झाली...

- **2.कार्यवाही दरम्यान केलेली निरीक्षणे व नोंदी:-**

नवोपक्रम दरम्यान आठवड्यातून एक दिवस विद्यार्थ्यांना ऑडिओ स्वरूपातील गोष्ट पाठविल्या जात होती पालक घरी आले की जसा वेळ मिळेल तशी त्यांनी ती ऐकायची त्यांना त्या गोष्टी बद्दल काय वाटले,हे त्यांची इच्छा असेल तरच त्यांनी आपल्या पालकांना सांगावयाचे.सुरवातीला विद्यार्थ्यांना आपल्या बोलीभाषेत गोष्ट ऐकायला मिळते याचाच त्यांनी आनंद घेतला, नंतर ती स्वतः बोलू लागली की रोज पाठवत जा न गोष्ट.. ते त्या गोष्टीबद्दल बोलू लागली,प्रतिक्रिया देत राहिली,गोष्टीतील पात्रांबद्दल तिने असे का केले? असे तर्क करू लागली.महिन्याभरात सर्व विद्यार्थ्यांची एक गुगलमीट द्वारे सभा घेतली तर त्यात ती गोष्टीं बद्दल स्वताचे मत मांडत होती.पुष्कळश्या कथा ह्या श्यामची आई पुस्तकातील घेतलेल्या होत्या.श्यामच्या आईच्या आठवणी गोष्टी रूपात ऐकतांना ती भावनिक होत होती.आपल्या आईशी ही आपण इतक्याच प्रेमाने वागायला हवे तिची प्रत्येक गोष्ट ऐकायला हवी हे समजून घेत होती.आठवड्यातून एकदा पालकांशी,शिक्षकांशी फोन वर चर्चा होत असे,पालकही खुश झाली होती मॅडम तुम्ही पाठविलेल्या गोष्टी आम्ही ही त्यांच्या सोबत ऐकतो,आपल्या भाषेतील गोष्टी ऐकण्यास मिळतात व मुले च त्यावर बोलतात,तुम्ही गोष्टीत सांगितलेल्या चांगल्या गोष्टींचे ते अनुकरण तर करतातच व दिलेल्या कृती ही पूर्ण करतात,स्वतः गोष्ट सांगण्याचा प्रयत्न करतात.गोष्टीचा उपक्रम पुढे जात असतांना काही गोष्ट मी त्यांना अर्धवट पाठवीत असे व यावर विचार करून ही गोष्ट तुम्ही पुढे पूर्ण करा असे सांगितलेले असे त्यामुळे त्यांची वैचारिकता वाढत होती.त्यांना हवा तसा ती गोष्टींचा शेवट करीत असे मानसी,श्रावणी,संगीता,

अजय,राहुल यांनी स्वतः गोष्ट तयार केली गुगल मिटिंग मध्ये ती सांगितली ही. यावरून विद्यार्थी कोणत्या दृष्टीने विचार करीत आहेत हे समजून येत होते.अजय ने तर बंजारा बोलीत त्याच्या स्वतःच्या अनुभवावर आधारित गोष्ट तयार केली तिचा व्हिडिओ पाठविला त्याची युट्युब लिंक सोबत जोडलेली आहेच,

शिक्षक व मी गृहभेटी ही देत होतो.तेव्हा गोष्टींबरोबर वाचन व अभ्यास ही त्यांना करायला सांगत होतो, हळूहळू मुले घरी जमेल तसा अभ्यास करून पाठवीत होती,वाचते होत होती.गोष्टी ऐकायला पाठविण्याचा उद्देश निव्वळ त्यांचे मनोरंजन करणे होता त्याचबरोबर विद्यार्थी कल्पकतेने विचार ही करायला लागले होते.मूल्यांची पेरणी ही आपसूकच होत होती.कोविड च प्रमाण कमी झालेले परंतु उपक्रम चालू असताना काही अडचणी येतात का त्याचा ही पाठपुरावा करीत होते.

- **3.उपक्रम पूर्ण झाल्यावर केलेल्या नोंदी:-**

इयत्ता 1 ली ते 7 वी चे सर्वच विद्यार्थी सुरवातीला गोष्ट मनोरंजन म्हणून ऐकत होते परंतु नंतर त्यांना गोष्ट ऐकण्याची सवय च लागली.गोष्ट ऐकल्यावर ते त्यावर विचार करू लागली,त्यांची कल्पकता वाढत होती,गोष्टी चा शेवट असा हवा होता किंवा गोष्टीतील पात्र याने अस नको करायला हवं असे ते आपल्या पालकांशी चर्चा करीत श्यामच्या आई च्या गोष्टी मुलांना खूप आवडतं,श्याम एवढ्या बिकट परिस्थितीत ही आई कडून रोज नवनवीन अनुभव घेत होता शिकत होता हे ऐकल्यावर ते ही आपल्या आई ची सर्व कामे  करायला लागली,आई बद्दल भरभरून बोलायला लागलीत.अजय चव्हाण तर कधी कधी आईला मदत व्हावी म्हणून सोबत मजुरीला ही जायचा,लक्ष्मी राठोड आई कामावर जाते म्हणून घरातील सर्व कामे करू लागली. हे अनुभव पालक सभा घेतल्यावर पालक सांगत असत.आता गोष्ट ऐकल्यावर त्यांना काही कृती ही करायला सांगत होते व त्या ही ते न चुकता करीत,नंतर तीन ते पाच शब्दांवरून त्यांना गोष्ट तयार करण्यास मी सांगत असे, ती ही ते करू लागले व अपूर्ण गोष्ट ही ते त्यांच्या अनुभवानुसार पूर्ण करू लागले.मुल अभिव्यक्त होऊ लागली,चर्चा करु लागली,विद्यार्थ्यांचे अनुभव समृद्ध होत होते त्यातून आपल्याच भाषेतील साहित्य ऐकण्यास मिळाल्याने आपल्या भाषेबद्दल चा अभिमान वाढत होता,आपल्या बोलीभाषेचा शाळेत एवढा सन्मान होतोय ह्याचा विद्यार्थ्यांना व पालकांना आनंद होत होता. शाळेत पालक आल्यावर शिक्षकांना गोष्टींच्या गमती सांगत शिक्षक ही खुश झाले,आपले विद्यार्थी आपसूकच शाळेत आनंदाने येतील असे त्यांना वाटत होते, मुलांना आता परत शाळेचे वेध लागले कधी शाळा सुरू होईल व बाईंना भेटू असे ही त्यांना झाले.

जून 2022 पासून शाळा सुरू झाल्या. परंतु आमचा गोष्टींचा उपक्रम आजही चालू आहे.आता तर परिपाठा त शिक्षक ह्या गोष्टी मुलांना ऐकवत असतात, यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सर्वधर्मसमभाव मूल्य आपोआप रुजले जातेय.आपल्या शाळेत आपल्या बोलीभाषेचा सन्मान होतोय सर्व जण ती भाषा समजून घेण्याचा प्रयत्न करताय आपले सण उत्सव ही शाळेत होत आहेत ह्यावर्षी जिल्हास्तरीय नृत्य स्पर्धेत आम्ही  दारूबंदी वर आधारित  बंजारा नृत्याचे सादरीकरण केले व तृतीय क्रमांक मिळविला.या नवोपक्रमामुळे बोलीभाषेचा शाळेत वापर होतोय,बोलीभाषेचा विकास होतोय,हा ऑडिओ गोष्टींचा उपक्रम इतर तालुक्यातील शिक्षक,विषयसाधनव्यक्ती,केंद्रप्रमुख पर्यंत पोहचला.सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यात ऊसतोडणी साठी बरेच बंजारा समाजातील लोक स्थलांतरित होतात त्यांच्या मुलांसाठी बार्शी त हंगामी स्थलांतरित शाळा असतात ह्या शाळांमध्ये ह्या ऑडिओ गोष्टी पोहचल्या व तेथील

सर्वच विद्यार्थी ही त्याचा लाभ घेत आहे.त्यांच्याशी व्हिडिओकॉल द्वारे चर्चा केली तर त्यांनी खूपच सकारात्मक प्रतिसाद दिला. म्हणजेच बोलीभाषे ला हळूहळू शाळेत स्थान मिळत आहे व

**नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात बोलीभाषेला स्थान देण्याचे उद्दिष्ट ही सफल होत आहे.**

- **4.कार्यवाही करताना आलेल्या अडचणी:-**

सुरवातीला खूप अडचणी आल्यात परंतु प्रयत्नांची कास धरलेली होती व जिद्दीने करायचेच या निर्धाराने आम्ही कामाला लागलो.लॉकडाऊन नंतर शाळा पूर्ववत होण्यासाठी बरेच महिने जाणार होते.यात बरेचसे पालक परप्रांतात स्थलांतरित झालेले त्यांचे कॉन्टॅक्ट शोधणे,त्यांना भेटणे कठिण जात होते.शिक्षकांना ही ऑनलाईनची व इतर बरीच कामे होती परंतु आपल्या विद्यार्थ्यांसाठी आम्ही कोरोना परिस्थितीत गृहभेटी साठी निघत असू.काही ठिकाणी खूप नकारात्मक अनुभव येत परंतु आमचा निर्धार पक्का होता,

बंजारा बोली ही जरी ऐकतांना छान वाटत असली तरी यात हिंदी,राजस्थानी,मारवाडी,गुजराती शब्दांची भेसळ आहे,ती बोलण्यास क्लिष्ट व कठीण आहे,त्यामुळे सर्व गोष्टींचे अनुवाद करण्यास ही कठीण गेले. गोष्टींचे रेकॉर्डिंग करीत असताना खूप लक्षपूर्वक एक एक शब्द अनुवादित करून बोलावा लागत होता सारखे प्रयत्न करावे लागत सुरवातीला 20 गोष्टींचे रेकॉर्ड करून ठेवले. नंतर विद्यार्थ्यांच्या अभिप्रायानंतर पुढचे काम चालू ठेवायचे की नाही हे ठरले होते. सुरवातीला च खूप प्रतिसाद मिळत गेला व पुढे काम चालू राहिले.


गृहभेटीत असे ही लक्षात यायचे की  काही पालकांकडे रिचार्ज ला पैसे नव्हते.तरी त्यांना मी स्वतः जाऊन रिचार्ज करून देत होते व त्यामुळे ऑडिओ गोष्टी त्यांना ऐकायला मिळावा व विद्यार्थ्यांना आनंद मिळावा हाच उद्देश होता.

जास्तीत जास्त बंजारा भाषिक विद्यार्थ्यांपर्यंत हे बोलीभाषेतील साहित्य पोहचवून त्यांच्यात मूल्यांची पेरणी करणे महत्वाचे होते प्रयत्नांच्या परिकष्टाने ते पोहचले..

- **माहितीचे विश्लेषण:-**

ह्या नवोपक्रमासाठी आवश्यक असे बालसाहित्य, राजीव तांबेचे गोष्टींचे पुस्तक,रंगू मूल्यवर्धनाच्या संगे,रंगू बंजारा भाषे संगे ह्या साहित्याची जुळवाजुळव केली उपक्रमासाठी कोणती माहिती आवश्यक आहे व कोणती साधने लागतील यांचे संकलन केले.त्यानंतर गोष्टींचे अनुवाद व शेवटी गोष्टींचे रेकॉर्डींग केले.

सदरील नवोपक्रम हा माझ्या कार्यक्षेत्रातील ठाणे महानगरपालिकेच्या कळवा परिसरातील पाच शाळांमधील 60 टक्के पेक्षा जास्त बंजारा भाषिक विद्यार्थ्यांसाठी तयार केलेला असून तो आजपर्यंत चालू आहे..आता हा उपक्रम ठाणे जिल्ह्यातील ठाणे तालुका, पातली पाडा, भिवंडी, बदलापुर येथील बंजारा भाषिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहचला असून रायगड जिल्ह्यातील जि.प शाळा उसर्लीखुर्द पनवेल रायगड ह्या शाळेत ही बंजारा भाषिक विद्यार्थ्यांना पोहचतोय तसेच सोलापूर जिल्ह्यातील बार्शी येथे ऊसतोडणी साठी आलेल्या हंगामी स्थलांतरित वस्तीत असलेल्या बंजारा भाषिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहचतोय तसेच धुळे व जळगाव जिल्ह्यातील विद्यार्थ्यांपर्यंत ही पोहचत आहे.



## ➢ नवोपक्रमाची यशस्विता:-

नवोपक्रमाची उद्‌दिष्टे ठरविल्यानंतर संपूर्ण नियोजन झाले व प्रत्यक्ष कार्यवाही करीत असतांना उद्‌दिष्टानुसार पुढील निष्कर्ष काढले आहेत हीच नवोपक्रमाची यशस्विता..

- बालकांच्या विकासाच्या प्रक्रियेत गोष्टींचे अनन्यसाधारण महत्व आहे आणि याच गोष्टी त्यांना आपल्या स्वतःच्या भाषेत ऐकण्यास मिळाल्याने त्यांच्यात मूल्यांची रुजवणूक आपसूकच झाली.
- नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात बोलीभाषेला स्थान देणे व आनंददायी शिक्षण पद्‌धतीत तर बोलीभाषेचा शाळेत वापर करण्यासंदर्भाचा शासन निर्णय आहे.बोलीभाषेतून ऑडिओ साहित्य पोहचत असल्याने हे उद्‌दिष्ट साध्य होत आहे.
- ऑडिओ गोष्टींच्या माध्यमातून विद्‌यार्थ्यांचा भावनिक,मानसिक व बौद्‌धिक विकास झाला.
- कोविड मुळे विद्‌यार्थ्यांच्या मनात निर्माण झालेली भीती ऑडिओ गोष्टींच्या साहाय्याने त्यांना मिळणाऱ्या अनुभवातून दूर झाली.मुले गोष्टींवर आधारित कृती घरातच करू लागले.
- सोशल मीडियाच्या माध्यमातून विद्‌यार्थ्यांच्या स्वतःच्या बोलीभाषचा विकास झाला.शाळेत आपल्या भाषेला सन्मान देताय आपल्या भाषेचा गोष्टींसाठी वापर करताय म्हणून पालक ही खुश झाले, व शाळेला जोडले गेले.
- गोष्टींच्या माध्यमातून विद्‌यार्थ्यांची कल्पकता व स्व अभिव्यक्ती कौशल्य निर्माण होण्यास मदत झाली,विद्‌यार्थी स्वतःहुन बोलायला लागले.त्यांचा आत्मविश्वास वाढला.
- ऑडिओ स्वरूपात गोष्टींचे दालन फक्त कळवा तालुक्यासाठी मर्यादित न राहता ते संपूर्ण जिल्हयात व्हाट्सअप च्या मदतीने पोहचले,जेथे जेथे बंजारा भाषिक विद्‌यार्थी आहे असे सोलापूर,अक्कलकोट, जळगाव,रायगड हया जिल्हयातील शिक्षकापर्यंत ते पोहचून आज संपूर्ण महाराष्ट्रातील बंजारा भाषा समजणारे विद्‌यार्थी ,पालक,इतर समाज व शिक्षक त्या गोष्टींचा लाभ घेत आहे. आता डाएट स्तरावर संपूर्ण जिल्हयात हया गोष्टी पोहचतील ही या नवोपक्रमाची सर्वात मोठी फलश्रुती आहे.

- **समारोप:-**

**“उडत्या पाखरांना परतीची तमा नसावी,**

**नजरेत सदा नवी दिशा असावी**

**घरट्याचे काय बांधता येईल केव्हाही**

**क्षीतिजाच्या पलीकडे झेप घेण्याची जिद्द असावी”.**

अश्याच जिद्दीने प्रेरित होऊन मी ऑडिओ कथांचे दालन बंजारा अभिव्यक्तीचे संप्रेषण हा नवोपक्रम राबविला. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात बोली भाषेचा विचार करण्यात आलेला आहे.तसेच आनंददायी शिक्षणपद्धतीच्या शासन निर्णयात बोलीभाषेचा शिक्षणात उपयोजन करण्यासंदर्भात सूचना दिलेल्या आहेत.बंजारा बोलीभाषेतील ऑडिओ गोष्टी देऊन ह्या उपक्रमाने मुलांच्या भाषेत एकप्रकारे अनौपचारिक शिक्षणाला सुरुवात झाली आहे.भाषेने मांणस जवळ येतात पण त्या पलीकडे हृदये जोडली जातात त्यामुळे ते नाते अधिक फुलत जाते. ऑडिओ गोष्टीतून बालकांना दिलेले अनुभवातून विद्यार्थ्यांचे व्यक्तित्व बहरत व फुलत गेले. बोलीभाषेतील गोष्टी विद्यार्थ्यांच्या कानी गेल्या आणि मूल्यांची पेरणी होण्यास मदत झाली.बालके अभिव्यक्त होऊ लागली,त्यांची कल्पकता वाढली,बुद्धीला चालना मिळाल्याने ते त्यांच्या भाषेत अभिव्यक्त होऊ लागली,गोष्ट स्वतः तयार करू लागली.महत्वाचे म्हणजे कोविड च्या भीतीतुन मुक्त होऊन परत शिक्षण घेण्यासाठी प्रेरित होऊन शाळेत यायला लागलीत.शालेय परिपाठा त ही गोष्ट सर्वांना ऐकायला मिळाल्याने सर्वधर्मसमभाव मूल्य विकसित झाले.आज संपूर्ण महाराष्ट्रात जिथे जिथे बंजारा समाज आहे तेथील सर्वच बालकांपर्यंत ह्या गोष्टी पोहचत आहे..

➢ **संदर्भसूची आणि परिशिष्टे:-**

| | पुस्तकाचे नाव | लेखक |
|---|---|---|
| 1 | रंगीत जादू | राजीव तांबे |
| 2 | किती मजा येईल | राजीव तांबे |
| 3 | घरोघरी खेळा खेळ | राजीव तांबे |
| 4 | वाचू आनंदे,मूल्यवर्धनाच्या संगे | शारदा चौधरी |
| 5 | श्यामची आई | साने गुरुजी |
| 6 | संस्कार गोष्टी | -- |
| 7 | रंगू बंजारा भाषे संगे | वनिता वंजारी |

https://youtu.be/Z2YwOjex0mo

https://youtube.com/shorts/gPY9J_S6xto?feature=share

https://youtube.com/shorts/mp1IXATLkQU?feature=share

https://youtube.com/shorts/-Ao6x5fInuA?feature=share

https://youtube.com/watch?v=LAHIqfMOJI4&feature=share

https://youtu.be/qt6U13Bsquw

https://youtu.be/Wg5WKxLO_AQ

https://youtu.be/RKsQu_3SkXw

https://youtube.com/shorts/cpdZNxF1iko?feature=share

https://youtube.com/shorts/cpdZNxF1iko?feature=share

https://youtube.com/shorts/6bvlCvs6iPE?feature=share



# रंगू बंजारा भाषे संगे

सौ. वनिता वंजारी/चव्हाण



Scanned with CamScanner


Vivo V9
Dual Rear Camera
2020.02.24 12:35




महावीर